पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११ ०१८.
वैद्यकीय मुख्य कार्यालय,
क्र:वैद्य/७/अ/कावि/३६ /२०१५
दिनांक : २१/०४/२०१५

**विषयः** - धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ चे अंमलबजावणीबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ लागू करण्यात आलेले आहे. तसेच याकामी सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनातून मासिक वर्गणी कपात करणेबाबत मा.आयुक्त सो. यांचेमार्फत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, लेखा विभागामार्फत याबाबत स्वतंत्र आदेश निर्गत केल्यानंतर कपात करण्यात येणार आहे.

परंतु दि.१/०४/२०१५ रोजीचे परिपत्रकानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे धन्वंतरी योजनेचे फॉर्म भरणेबाबत सर्व कर्मचा-यांना कळविण्यात आलेले होते. त्यानुसार सर्व विभागप्रमुखांनी त्यांचे कर्मचा-यांचे फॉर्म या कार्यालयाकडे दि.२०/०४/२०१५ पूर्वी सादर करणे आवश्यक होते. परंतु अद्यापपर्यंत फक्त ३६४० अधिकारी / कर्मचारी यांचे फॉर्म अपलोड करण्यात आलेले आहे. तथापि, सदर फॉर्म व त्यासोबतची कागदपत्रे तपासणीसाठी अद्यापपर्यंत विभागाकडे प्राप्त नाहीत.

सबब, प्रस्तुतचे परिपत्रकान्वये सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, दि.१/०५/२०१५ पासून सध्या लागू असलेले वैद्यकीय बिलांचे प्रतिपूर्ती व समायोजनाचे धोरण बंद करण्यात प्रस्तावित असून त्यानंतर धन्वंतरी स्वास्थ्य योजना लागू होणार आहे. तरी ज्या विभागांमार्फत त्यांचेकडील अधिकारी / कर्मचारी यांचे फॉर्म अपलोड केलेले नाहीत त्यांनी ते तातडीने अपलोड करून वैद्यकीय विभागामध्ये फॉर्म सदस्यत्व देण्यासाठी / तपासणीसाठी जमा करावेत.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११ ०१८.